सन १९८४ च्या दंगलीत मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता निवृत्तीवेतन अदा करण्यासाठी रक्कम वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णयक्रमांकः आरएलएफ-२०१८/प्र.क्र.६/म-०३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २१ फेब्रुवारी. २०१८

वाचा :

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.आरएलएफ-२०१६/प्र.क्र.९१/म-३, दि. ३० मार्च, २०१७.
२) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र.मशा/संकीर्ण-२००८/ई-८, दि. ९ जानेवारी, २०१७.
३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र.उपआ(सा.प्र.)/जी.बी.-२/कावि-३९/२०१८, दि. १९ जानेवारी, २०१८.

प्रस्तावना :

१९८४ साली झालेल्या दंगलीतील बाधित व्यक्तींना मदत देण्यासंदर्भात ना.नानावटी यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आला होता. सदर आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिनांक १६ जानेवारी,२००६ रोजी विशेष पॅकेज जाहीर केले होते. या पॅकेजमधील मार्गदर्शक तत्वानुसार सदर दंगलीतील मृत व्यक्तींच्या वारसदारांना प्रत्येकी दरमहा रुपये २,५००/- इतके निवृत्तीवेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे.

०२. केंद्र शासनाच्या वरील पॅकेजनुसार १९८४ च्या दंगलीतील मृत झालेल्या व्यक्तींच्या पात्र वारसदारांना सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता निवृत्तीवेतन अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

शासन निर्णय :

सन १९८४ च्या दंगलीत मृत झालेल्या व्यक्तींच्या पात्र वारसदारांना केंद्र शासनाच्या दिनांक १६ जानेवारी,२००६ च्या पॅकेजनुसार सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे प्रती व्यक्तीस दरमहा रुपये २,५००/- (रुपये दोन हजार पाचशे फक्त) याप्रमाणे निवृत्तीवेतन अदा करण्यासाठी याद्वारे एकूण रुपये १.२० लक्ष (रुपये एक लक्ष वीस हजार फक्त) एवढा निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. या एकूण निधीपैकी विभागीय आयुक्त, नाशिक यांना रुपये ६०,०००/- (रुपये साठ हजार फक्त) व विभागीय आयुक्त, अमरावती यांना रुपये ६०,०००/- (रुपये साठ हजार फक्त) इतक्या रक्कमेचे वितरण करण्यात येत आहे.

०२. यासाठी होणारा खर्च, "मागणी क्र.सी-५, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण-६०, इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम-२००, इतर कार्यक्रम-२००(०१)(०४) १९८४ च्या दंगलीतील मृत व्यक्तींच्या वारसांना निवृत्तीवेतन- (२२३५-ए ३२९) (दत्तमत) या मुख्य लेखाशीर्षाखालील सन २०१७-२०१८ मधील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

०३. विभागीय आयुक्त, नाशिक व विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी दरमहा रुपये २,५००/- याप्रमाणे निवृत्तीवेतन देय असून तद्नुसार माहे एप्रिल,२०१७ ते माहे मार्च,२०१८ या कालावधीतील निवृत्तीवेतन पात्र वारसदारांच्या हयातीची खात्री केल्यानंतर एकरक्कमी तात्काळ अदा करण्यात यावे.

०४. आहरण व संवितरण अधिकारी यांनी कोषागार/उप कोषागार यांचेकडे पाठविण्यात येणाऱ्या देयकासोबत जोडल्या जाणाऱ्या संगणक चिठ्ठीमध्ये (Computer Slip) गौण/ उपशिर्षाच्या गणकयंत्र सांकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा, असे आदेश नियंत्रक अधिकाऱ्यांनी द्यावेत.

०५. कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची दक्षता नियंत्रक अधिकाऱ्यांनी घ्यावी. तसेच खर्चाचा मेळ महालेखापाल यांनी नोंदविलेल्या खर्चाशी घ्यावा व महालेखापालांच्या ताळमेळ प्रमाणपत्रासह विनियोजन लेखे शासनाकडे तात्काळ पाठवावे.

०६. सदर प्रकरणी होणाऱ्या खर्चाचे पत्रक विहित कालमर्यादेत न चुकता शासनास प्राप्त होतील, याची दक्षता विभागीय आयुक्त, नाशिक व विभागीय आयुक्त, अमरावती यांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२११५५९४१३११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.02.21 16:00:09 +05'30'

(सु. ह. उमरणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, नाशिक/अमरावती.
२. जिल्हाधिकारी, अहमदनगर/बुलडाणा
३. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
४. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५. संचालक, लेखा व कोषगारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर/बुलडाणा.
७. निवडनस्ती (कार्यासन म-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रत माहितीसाठी:-

१. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४. अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विवरणपत्र

शासन निर्णय क्र.आरएलएफ-२०१८/प्र.क्र.६/म-०३, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ सोबतचे विवरणपत्र

(१९८४ च्या दंगलीत मृत झालेल्या खालील ०४ व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी दरमहा रुपये २,५००/- याप्रमाणे सन २०१७-२०१८ करीता निवृत्तीवेतनाची रक्कम अदा करण्याबाबतचा तपशील)

अ.क्र.	महसूल विभाग	जिल्हा	मृत व्यक्तीचे नांव	वारसदाराचे नाव व नाते
१.	नाशिक	अहमदनगर	पिरु उर्फ पिरन हसन सय्यद	श्रीमती सुग्रबी सय्यद (आई)
२.	नाशिक	अहमदनगर	सतपालसिंग नंदपालसिंग	श्रीमती दर्शन कौर सतपालसिंग बाजवा (पत्नी)
३.	अमरावती	बुलडाणा	टिकाराम देवजी सातव	श्रीमती कस्तुराबाई टिकाराम सातव (पत्नी)
४.	अमरावती	बुलडाणा	दिनगर सिताराम डाबरे	श्रीमती सत्यभामाबाई दिनकर डाबरे (पत्नी)

*****